# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.10.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या,**

१. राष्ट्रीय लोकशाही आघाडी देशाच्या प्रगतीसाठी तसंच गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध – पंतप्रधानांचं प्रतिपादन

२. ऑनलाइन गैरव्यवहारांच्या वाढत्या धोक्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारचं स्कॅम से बचो अभियान सुरू

३. रेल्वेचं आगाऊ आरक्षण आता 60 दिवस आधी करता येणार

आणि

४. भारत न्यूझीलंड कसोटी सामन्यात भारताचा पहिला डाव अवघ्या 46 धावात गुंडाळून दिवसअखेर न्यूझीलंडच्या 3 बाद 180 धावा

**PM**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी देशाच्या प्रगतीसाठी तसंच गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. चंदीगडमध्ये काल पंतप्रधानांच्या उपस्थितीत एनडीएच्या मुख्यमंत्र्यांची आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक झाली. त्यानंतर पंतप्रधानांनी समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला. या बैठकीत सुशासन आणि लोकांचं जीवनमान सुधारण्यावर सविस्तर चर्चा झाल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. तसंच संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यावरही चर्चा झाली. एनडीएचे 17 मुख्यमंत्री आणि 18 उपमुख्यमंत्री या बैठकीत सहभागीझाले होते. भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा यावेळी उपस्थित होते. या बैठकीत सहा ठराव मंजूर करण्यात आल्याची माहिती नड्डा यांनी दिली.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मालावीचे राष्ट्राध्यक्ष लॅझरस चकवेरा यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. तसंच दोन्ही देशांमध्ये विविध मुद्द्यांवर शिष्टमंडळ स्तरावरची चर्चादेखील होणार आहे. राष्ट्रपती मालावीमधल्या राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि स्मृतीस्थळाला भेट देणार आहेत. दरम्यान, काल संध्याकाळी राष्ट्रपती मुर्मू यांनी मालावीमधल्या भारतीय समुदायाशी संवाद

साधला. चांगलं काम करत राहा आणि विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी सक्रिय योगदान द्या असं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

**ऑनलाइन घोटाळा**

ऑनलाइन गैरव्यवहारांच्या वाढत्या धोक्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकार आणि मेटा कंपनीनं स्कॅम से बचो हे अभियान सुरू केलं आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, गृह मंत्रालय तसंच भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र यांनी मिळून या अभियानाचा आराखडा निश्चित केला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत या अभियानाचा काल नवी दिल्लीत प्रारंभ करण्यात आला. डिजिटल सुरक्षा आणि सतर्कता याबाबतच्या सरकारच्या दृष्टीकोनाचं प्रतिबिंब यामध्ये आहे हा उपक्रम अगदी योग्य वेळी सुरू झाला असून ऑनलाइन घोटाळ्याचा वाढता धोका पाहता नागरिकांच्या हितासाठी केलेली ही आवश्यक उपाययोजना आहे असं जाजू यावेळी म्हणाले. डिजिटल इंडिया अभियानामुळे देशातली इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या 90 अब्जांवर गेली आहे. त्याचवेळी सायबर गुन्ह्यांची संख्याही वाढते आहे असं त्यांनी सांगितलं.

**रेल्वे**

भारतीय रेल्वेनं आगाऊ आरक्षणाचा कालावधी कमी केला आहे. त्यामुळे आता केवळ साठ दिवस अगोदर आगाऊ आरक्षण करता येईल. यापूर्वी 120 दिवस अगोदर आगाऊ आरक्षण करता येत होतं. हा नवा नियम येत्या 1 नोव्हेंबरपासून अमलात येणार असल्याचं रेल्वे मंत्रालयानं कळवलं आहे. त्यामुळे 31 ऑक्टोबरपर्यन्त आरक्षण केलेल्या पर्यटकांना या निर्णयाचा काहीही फटका बसणार नाही. परदेशी पर्यटकांसाठी आगाऊ आरक्षणाची असलेली 365 दिवसांची मुदत तशीच कायम ठेवण्यात आली आहे.

**इस्राइल**

इस्राइलमध्ये गेल्या वर्षी 7 ऑक्टोबर रोजी झालेल्या हल्ल्यामागचा मुख्य सूत्रधार आणि हमासचा प्रमुख याह्या सिनवर उर्फ अबू इब्राहिम मारला गेल्याची माहिती इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी दिली आहे. मात्र इस्राइलचं गाझा युद्ध अद्याप संपलेलं नाही असंही त्यांनी सांगितलं. दरम्यान सिनवरच्या मृत्यूच्या वृत्ताला हमासनं अद्याप दुजोरा दिलेला नाही.
काल गाझावरील कारवाईत तीन दहशतवादी मारले गेल्याचं इस्राइलच्या लष्करानं सांगितलं.

**झारखंड निवडणूक**

झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी केली जाईल. 25 ऑक्टोबरपर्यंत यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. 28 तारखेला अर्जांची छाननी होईल आणि 30 ऑक्टोबर ही अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. झारखंडमध्ये पहिल्या

टप्प्यात 13 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. राज्यात सर्वच राजकीय आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबतच्या चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. राज्यात भाजपा, एजेएसयू, संयुक्त जनता दल आणि चिराग पासवान यांच्या एलजीपी पक्षांनी आघाडी केली असून झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि मार्क्सवादी पक्षासोबत निवडणूक लढवणार आहे.

**चोक्क लिंगम**

विधानसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित व्यक्तीचं नाव मतदार यादीत समाविष्ट असणं आवश्यक आहे. ज्या पात्र मतदारांनी आपलं नाव मतदार यादीत अजूनही समाविष्ट केलेलं नाही, त्यांना उद्यापर्यंत म्हणजे 19 ऑक्टोबरपर्यंत मतदार यादीत आपलं नाव नोंदवण्याची संधी आहे. आपलं नाव मतदार यादीत समाविष्ट झालं असल्याची खात्री प्रत्येक मतदाराने करावी. तसंच ज्यांनी अजून आपलं नाव मतदार यादीत समाविष्ट केलेलं नाही त्यांनी तातडीनं आपलं नाव मतदार यादीत नोंदवावं, असं आवाहन महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

**प्राप्तीकर मुंबई**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुका मुक्त आणि पारदर्शी असाव्यात यासाठी निवडणूक काळातला पैशांचा गैरवापर रोखण्यासाठी प्राप्तीकर विभागानं 24 तास कार्यरत राहणारा निवडणूक खर्च देखरेख कक्ष स्थापन केला आहे. राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असेपर्यंत हा कक्ष काम करेल. निवडणूक काळात पैशांचा गैरवापर होत असल्याचं आढळल्यास नागरिकांनीही दूरध्वनी, व्हॉटसऍप संदेश अथवा इ मेलद्वारे त्याची माहिती प्राप्तीकर विभागाला द्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

**सैनी**

नायबसिंह सैनी यांनी हरियाणाचे मुख्यमंत्री म्हणून काल सलग दुसऱ्यांदा शपथ घेतली. राज्यपाल बंडारू दत्तात्रय यांनी पंचकुलामध्ये त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी अनिल विज, कृष्ण पंवर, राव नरबीरसिंह यांच्यासह १३ मंत्र्यांनीही शपथ घेतली. सैनी यांच्या शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

**क्रीडा विधेयक**

केंद्रिय युवा आणि क्रीडा कल्याण मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी काल भारतीय ऑलिम्पिक संघटना, राष्ट्रीय क्रीडा महामंडळ आणि राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन संघाच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. या बैठकीत राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या आराखड्याबाबत चर्चा झाल्याची माहिती

मांडवीय यांनी दिली. केंद्र सरकार भारताला क्रीडा क्षेत्रात आघाडीवर पोहोचवण्याप्रती वचनबद्ध आहे. त्यासाठी क्रीडा क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा भक्कम केल्या जात आहेत तसंच क्रीडापटूंच्या कौशल्याला प्रोत्साहन दिलं जात आहे असं मांडवीय यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बंगळुरू इथं खेळल्या जात असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी काल न्यूझीलंडच्या संघानं तीन गडी बाद 180 धावा केल्या. त्यापूर्वी भारताचा पहिला डाव सर्वबाद 46 धावांवर संपला. भारताची ही यजमान म्हणून खेळलेल्या सामन्यांमधली सर्वात कमी धावसंख्या आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला भारतीय संघ खेळपट्टीवर टिकाव धरुच शकला नाही. विराट कोहलीसह भारताचे 5 फलंदाज शून्यावर बाद झाले. पावसामुळं कसोटीच्या पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नव्हता.

**महिला क्रिकेट**

महिलांच्या 20 षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेनं अंतिम फेरीत धडक मारली आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात काल दक्षिण अफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाचा आठ गडी राखून पराभव केला. दुसरा उपांत्य सामना वेस्ट इंडिज आणि न्यूझीलंड यांच्यात आज शारजाह येथे खेळला जाणार आहे.

**खेलो इंडिया**

आसाममधल्या तामूलपुर या छोट्या गावातल्या खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रातल्या सहा तलवारपटूंची 68 व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुढच्या महिन्यात जम्मू काश्मीरमध्ये या स्पर्धा होणार आहेत.

**सोनेजप्त**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाच्या गुप्तचर यंत्रणेने तीन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये 1 कोटी 13 लाख रुपये किमतीचे दीड किलो सोनं जप्त केलं आहे.

**भूकंप**

मेघालय आणि त्रिपुरा राज्याच्या नैऋत्य भागात काल भूकंपाचे सौम्य धक्के बसले. यामध्ये कोणतीही जिवीत अथवा वित्त हानी झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**